# नियमित दिवाणी दावा क्र.१७८/२०२५ मधील अर्ज (नि.क्र.२०) वरील आदेश
# (ज्ञानेश्वर वि. शिवाजी व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचे विरुद्ध झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार, प्रतिवादींना कैफियत दाखल करणेकामी आवश्यक ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी यांना वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे दाव्यातील त्यांच्या विरुद्ध झालेला 'विना कैफियत'चा आदेश रद्द होवून कैफियत देण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर नि.क्र.२२ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी अर्जात दिलेले कारण योग्य नसून प्रतिवादी हे दाव्याचे कामकाज जाणून बुजून लांबवितात. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेची विनंती केली आहे. विकल्पाने प्रतिवादीस र.रु.५०००/- दंड करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुद्ध निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला असल्याचे दिसून येत आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना दि.०९.०६.२०२५ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. परंतु, ते न्यायालयात हजर होवून त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादींविरुद्ध मनाई हुकूमाची मागणी केली असल्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादींचे हक्क व हितसंबंध दिसून येत आहेत. त्यामुळे प्रतिवादींना लेखी कैफियत सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या कारणामुळे न्यायोचित दिसून येत आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास वादी याचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना त्यांची कैफियत सादर करुन त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे न्यायोचित दिसून येत आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ३

यांना कैफियत देण्यासाठी केलेला विलंब विचारात घेता प्रतिवादींनी वादीस खर्चाची र.रु.५००/- देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ ते ३ चा सदरचा अर्ज हा खर्च/कॉस्ट र.रु.५००/- वादीला पुढील तारखेला किंवा तत्पूर्वी देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2026.01.03 17:19:42 +0530

फलटण. ( ए. एस. साटोटे )

दिनांकः-०३.०१.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण